Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-IX Sept. 2017

Address
• Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
• Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
• (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
• aiirjpramod@gmail.com
• aayushijournal@gmail.com

Website
• www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - IV Issue-IX SEPTEMBER 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

# भारतीय कर्मचारी प्रशासना पुढील समस्या

**प्रा. अर्चना पावले,**
लोकप्रशासन विभाग,
महात्माबसवेश्वर महाविद्यालय, लातूर

**प्रस्तावना :**

आधुनिक लोकशाही शासन पद्धतीत किंवा कल्याणकारी राज्यात कर्मचारी प्रशासनालाअत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. कारण प्रशासनाशिवाय शासनाचे ध्येय किंवा उद्दिष्टे साध्य होत नाहीत. त्यासाठी चांगले कार्यक्षम प्रशासन असण आवश्यक आहे. कुशल आणि कार्यक्षम मानवी बळावर प्रशासनाचे यश अपयश अवलंबून असते. कर्मचाऱ्यांच्या संख्येवरून प्रशासनाचे यशापयश अवलंबून नसते तर त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रशासनाचे यश अवलंबून असते.

म्हणूनच कर्मचाऱ्यांना प्रशासनरुपी यंत्राचा चालक व प्रशासनरुपी इमारतीचा मुख्य आधारस्तंभ मानले जाते. म्हणजेच कर्मचारी हा प्रशासनाचा आत्मा समजले जाते.

आधुनिक काळात विज्ञान व माहिती तंत्रज्ञानाचा विकास झाला असला तरी तंत्रज्ञानाचा वापर मानवालाच करावा लागतो. म्हणूनच शासनाने जनतेच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी लोकप्रशासनावर सोपवली आहे.

डॉ. पी. एम. शर्मा यांनी, मानवी बळाचा जास्तीत जास्त वापर करणे म्हणजेच कर्मचारी प्रशासन अशी व्याख्या केली आहे. परंतु ही व्याख्या सार्थ ठरण्यासाठी कर्मचारी प्रशासनाच्या समस्यांचा अभ्यास करावा लागतो.

**संशोधन उद्देश :**

कर्मचारी प्रशासनाचा अभ्यास करत असताना असे कुठेतरी जाणवले की, शासनाची ध्येयधोरणे, आम जनतेच्या इच्छा अपेक्षांची पूर्ती कर्मचारी प्रशासनाकडून होते. परंतु या अपेक्षा पूर्ण करत असताना खरोखरच सामान्य जनतेच्या अपेक्षा पूर्ण होतात का ? तसेच कर्मचारी कार्यक्षमपणे किंवा प्रामाणिकपणे हे कार्य पूर्ण करतो का? हे करत असताना त्याला कोणत्या अमिषाला बळी तर पडावे लागत नसेल ? किंवा कोणाच्या दबावाखाली तर नसेल असे वाटले आणि या विषयावर विचार करणे आवश्यक आहे असे वाटले. म्हणजेच बारकाईने अभ्यास करणे आवश्यक आहे.

१) कर्मचारी प्रशासनाचे सातत्य टिकवून ठेवण्यासाठी
२) कार्यक्षमता, कुशलता टिकवून ठेवणे.

**कर्मचारी प्रशासनाच्या समस्या :**

कर्मचारी प्रशासनात भरती, प्रशिक्षण, बढती, सेवानिवृत्ती इ. विषयांचा अभ्यास केला जातो. या सर्व बाबींचा संबंध कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेशी येतो.

जनतेच्या सर्वच अपेक्षांची पूर्तता कर्मचारी प्रशासनाकडून शक्य नसेल तर किमान जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी साधने उपलब्ध करून देण्याची महत्वाची जबाबदारी कर्मचारी प्रशासनाला पार पाडावी लगते. या गरजांची पूर्तता करत असताना कर्मचारी प्रशासनाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. प्रशासनातील अनेक समस्यांपैकी बऱ्याच समस्या या कर्मचाऱ्यांशी संबंधित असतात. काही गंभीर बनणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**१. मनोबल :**

मनोबल ही एक मानसिक स्थिती आहे. उच्च मनोबलाशिवाय कर्मचारी कार्यक्षमतेने व कुशलतेने कार्य करू शकत नाही. मनोबल ही प्रशासकीय संघटनेची शक्ती मानली जाते. उच्च मनोबलाशिवाय कोणतीही संघटना प्रभावीपणे कार्य करू शकत नाही. कोणत्याही व्यक्तीची उत्साही मनोवृत्ती उच्च मनोबल दर्शविते. कर्मचाऱ्याचे मनोबल उच्च असेल तर अशक्य गोष्टी शक्य होतात.

प्रशासनातील कर्मचाऱ्यांचे मनोबल खचल्यास कोणतीही संघटना आपले ध्येय साध्य करू शकत नाही. "मनोबल म्हणजे एखादे ध्येय गाठण्यासाठी सतत उत्साही राहणे." एखाद्या कार्यात सहकार्य द्यावे किंवा नाही हे ठरविणारी कर्मचाऱ्यांची मानसिक अवस्था म्हणजे मनोबल होय. कर्मचाऱ्यांचे मनोबल उच्च असेल तर संघटनेचे उद्दिष्ट साध्य होतात.

त्यासाठी कर्मचाऱ्यांच्या मनोबलात वाढ करणे आवश्यक आहे. म्हणजेच त्यांचे वेतन वाढविणे त्सेच कार्य करण्यासाठी वातावरण योग्य असणे आवश्यक आहे. सर्व कर्मचाऱ्यांना समान संधी देणे आवश्यक आहे. काम करत असताना आपल्या कामाचा मोबदला म्हणून निवृत्ती वेतनाची तरतूद करावी लागते. जेने करून त्यांना सुरक्षित वाटेल.

उच्च मनोबलामुळे कर्मचारी पूर्ण क्षमता वापरून काम करतो आणि त्याचा परिणाम संघटनेवर होतो. म्हणून मनोबल ही समस्या बनू न देता त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**२. भ्रष्टाचार :**

भ्रष्टाचार ही आधुनिक काळातील समस्या नसून अगदी प्राचीन काळापासून चालत आलेली समस्या आहे. कौटील्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात भ्रष्टाचाराबाबत विचार मांडले आहेत. भ्रष्टाचार ही भारतातीलच नव्हे तर जागतिक स्तरावरील समस्या आहे असे आचरण म्हणजे भ्रष्टाचार होय.

भ्रष्टाचाराचा साधा सरळ अर्थ सांगता येतो. एखादी व्यक्ती आपले अधिकार वापरून जाणीवपूर्वक आपला वैयक्तिक किंवा नातेवाईकांचा फायदा करून घेतो. तेव्हा अशा वर्तनाला भ्रष्टाचार म्हणतात. भ्रष्टाचार समस्या जाणून घेण्यासाठी भ्रष्टाचाराची कारणे जाणून घ्यावी लागतात.

**भ्रष्टाचाराची कारणे :**

आपला भारत देश हा विकासाच्या मार्गावर असला तरी भ्रष्टाचार ही समस्या चिंताजनक बनली आहे. ही समस्या देशापुरतीच मर्यादीत नसून जागतिक स्तरावरची समस्या बनली आहे.

१. ऐतिहासिक कारण
२. सामाजिक कारण
३. आर्थिक विषमता
४. प्रशासनाची कामकाज पद्धती
५. नैतिक मुल्यांचा ऱ्हास
६. राजकीय कारण

इ. कारणामुळे भ्रष्टाचार ही समस्या वढत चालली आहे. ही समस्या नष्ट होण्यासाठी त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**भ्रष्टाचार प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

१. भ्रष्टाचारी व्यक्तीला कठोर शिक्षा करण्यात यावी.
२. योग्य ते वेतन भत्ते देण्यात यावे.
३. सुरक्षिततेची हमी देण्यात यावी.
४. भ्रष्टाचार विरोधात जनआंदोलने करण्यात यावी.
५. सर्वांना समान संधी देण्यात यावी.

इ. उपाययोजना करण्यात याव्यात.

याप्रमाणेच शिस्तभंग, राजकीय तटस्थता, आचारसंहिता या समस्या वाढत चालल्या आहेत. यावर सुद्धा उपाययोजना करणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांपुढे या समस्या आव्हान म्हणून समोर येत आहेत. कर्मचाऱ्यांना त्यांची जबाबदारी पार पाडत असताना विविध आव्हानांना तोंड द्यावे लागते. आव्हाने पेलण्यासाठी कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढीस लावणे आवश्यक आहे. एखाद्या कर्मचाऱ्याने प्रशासनात शिस्तभंग केला असेल तर त्याच्यावर नियंत्रण करणे आवश्यक आहे.

**सारांश :**

यावरून असे लक्षात येते की, कर्मचारी प्रशासन हा जनतेचा आत्मा असल्यामुळे समस्यावर उपाययोजना करून कर्मचाऱ्यांचे मनोबल, कार्यक्षमता, नीनीधैर्य वाढविणे आवश्यक आहे.

**समारोप :**

कल्याणकारी राज्याचे स्वरूप म्हणजेच जनतेचा सर्वांगीण विकास कर्मचारी प्रशासनावर अवलंबून असतो. त्यामुळे कर्मचारी प्रशासन सक्षम बनविणे ही गरज निर्माण झाली आहे. ज्याप्रमाणे राज्याचे स्वरुप राज्यकर्त्यावर अवलंबून असते त्याप्रमाणे चांगल्या प्रशासनाचे स्वरुप तेथील कर्मचाऱ्यावर अवलंबून असते. म्हणूनच कर्मचारी प्रशासनाला लोकप्रशासनाची आधारशिला म्हटले आहे.

**संदर्भग्रंथ :**

१. प्रा. भिंगे सुभाष, कर्मचारी प्रशासन, अरुणा प्रकाशन लातूर.
२. सुरेंद्र कटारिया, कार्मिक प्रशासन, जयपूर.
३. उच्चत्तर लोकप्रशासन, बी. एल. फाडीया, दिल्ली.